admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

MCAER कृषि परिषद

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com — दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

संकेतस्थळ : www.mcaer.org — फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१२१८/१५०० — दि. जून,२०१८

02 JUL 2018

## परिपत्रक

विषयः- **पदवी प्रवेश प्रक्रिया २०१८-१९ अंतर्गत उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate ) दाखल करण्याबाबत.**

संदर्भः- १. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१३९४, दि. १९/६/२०१८
२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मकृप/शिक्षण-१/१२१८/१४८१, दि. ३०/६/२०१८

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश,२०१८ दि. २४/६/२०१८ नुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याविषयी या कार्यालयाच्या संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकान्वये वेळापत्रक व सूचना देण्यात आलेल्या आहेत. **सदरचे वेळापत्रक व सूचना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्रासाठीसुध्दा (Non-Creamy Layer Certificate ) लागू करण्यात येत आहेत.**

यास्तव प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध नसल्यास, उमेदवारांनी जात प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत, तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला असल्याची संबंधित कार्यालयाची पावती, प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी अपलोड करावी. तसेच महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेचेवेळी सदरची बाब विचारात घेऊन कागदपत्रे प्राप्त करून घेण्याविषयी प्रक्रिया करावी.

(रविंद्र जगताप) भा प्र से
**महासंचालक**

प्रतः-

१. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे व परिपत्रकामधील सूचना विचारात घेऊन प्रवेश प्रक्रिया राबवावी.

३. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.
यांना त्यांच्या दि. ३०/६/२०१८ रोजीच्या पत्रास अनुसरून माहितीस्तव सविनय सादर...